## Report on the eighth event organized by ACTREC Alumni Association on 'Cancer Screening and Support Awareness Abhiyaan (CSSAA-3)' at Vasantrao Acharekar Sanskrutik Pratishthan, Kankavli, Sindhudurg on 13th January, 2013

The eighth AAA event was organized in collaboration with Doctor's Friday Club (DFC), Kankavli, Sindhudurg at Vasantrao Acharekar Sanskrutik Pratishthan, Kankavli, Sindhudurg. The event was sponsored by Biocon OncoTherapeutics, Banglore; NuLife Pharmaceuticals, Pune; Indian Medical Association, Kankavli; Saraswat Bank-Kankavli and Sindhuratna Foundation, Sindhudurg. Dr Milind Kulkarni, Secretary, DFC welcomed all the participants. Dr Prafulla Amberkar, President DFC introduced activities of DFC to all. He informed all about the increasing rate of cancer cases in Sindhudurg region thus emphasized the need to organize such health-related awareness talks in this region which may lead to early detection of cancer. Dr Amberkar felicitated all the guest speakers. Later Dr. Jyoti Kode, Secretary, AAA introduced ACTREC Alumni Association activities to all. Dr Nitin Shetye introduced the lead speaker Dr Rajiv Sarin as Director, ACTREC and In-charge, Cancer Genetics Division at ACTREC/Tata Memorial Hospital, Tata Memorial Centre, Mumbai. Dr. Sarin discussed in details information on common cancers in men and women viz. oral cancer, prostate cancer (men), breast cancer and cervical cancer (women) with emphasis on pre-disposing factors, exposure to tobacco or fat-rich diet, diagnosis, and importance of prevention and management of these cancers. He also mentioned about increasing incidence of cancer at global level and also at india level. Then he discussed in brief the information about familial cancers. This was interactive session and old-n-young participants got their queries answered by asking questions themselves or reading through coordinators. Few of the participants had also got patient files and got the knowledge about the ongoing treatment from Dr Sarin. This was a public lecture and around 100 participants attended it. The age group was around 30-70 years. Due to time constrains and adjudging interest of participants in knowing more on cancer-related information, support awareness talks had to be skipped. However brochures on cancer prevention, early detection, platelet donation awareness and marrow donation awareness were distributed amongst the participants in three languages Hindi, Marathi and English.. The program started at 4.30pm and ended at 7.00pm. At around 7.15pm, Continued Medical Education for doctor's community was commenced at the same venue. Dr Swapnil Rane introduced the theme of the event to all doctors present. Dr Prashant Moghe welcomed all guest speakers of CME. Dr Rajiv Sarin discussed the global cancer incidence and importance of cancer genetics in familial cancers. He also emphasized the need for early detection of cancer to control cancer incidence. Dr Bhausaheb Bagal, Assistant Professor of Medical Oncology and Bone Marrow transplantation Unit at ACTREC, TMC delivered brief presentation on bone marrow transplantation process, its applications and mandate of Marrow Donor Registry India (MDRI). Dr Shashank Ojha, In-charge, Blood Transfusion Unit, ACTREC-TMC gave short presentation on importance of blood components and platelet donation during serious health ailments as well as during cancer treatments. All three talks were followed by answers to queries raised by doctor participants. In all, around 50 participants attended the CME event. The program ended at 9.00pm followed by dinner.

# कोकणात 'ब्रेस्ट कॅन्सर'चे प्रमाण वाढते!

## बदलती जीवनशैलीही कारणीभूत : संशोधन सुरू : कणकवलीत कॅन्सर मार्गदर्शन कार्यशाळा

**▶ कणकवली / प्रतिनिधी**

कॅन्सरमध्ये सुरुवातीलाच निदान होणे अत्यंत आवश्यक असून अशा स्टेजमध्ये निदान झाल्यास आजार बरा होण्याचे प्रमाण ८० ते ९० टक्के आहे. कॅन्सरच्या इतर नियमित कारणांबरोबरच 'फॅमिली हिस्ट्री' असल्यास शक्यता वाढते. तसेच 'लाईफ स्टाईल'मुळे ब्रेस्ट कॅन्सरचे प्रमाण वाढत आहे. महाराष्ट्राचा विचार केल्यास कोकणपट्ट्यात 'ब्रेस्ट कॅन्सर'चे प्रमाण अधिक असून 'फॅमिली हिस्ट्री'त ती शक्यता वाढलेली दिसते. आजतरी याचे प्रमुख कारण बदललेली 'लाईफ स्टाईल'च दिसून येत असले तरीही यावर संशोधन सुरू असल्याची माहिती टाटा मेमोरियल हॉस्पिटलच्या एसीटीआरईसी विभागाचे डायरेक्टर डॉ. राजीव सरीन यांनी येथे दिली.

ॲडव्हान्स ट्रिटमेंट फॉर रिसर्च अँड एज्युकेशन फॉर कॅन्सर तसेच 'डॉक्टर्स फ्रायडे क्लब'च्या संयुक्त विद्यमाने आणि सारस्वत बँकेच्या प्रायोजकत्वाने येथील आचरेकर प्रतिष्ठानच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या कॅन्सर जागृती अभियान कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी एसीटीआरईसी डॉ. भाऊसाहेब बागल आणि डॉ. शशांक ओझा तसेच डॉ. ज्योती कोदे, डॉक्टर्स फ्रायडे क्लबचे डॉ. प्रफुल्ल आंबेरकर, डॉ. शमिता बिरमोळे, डॉ. विद्याधर तायशेटे, डॉ. मिलिंद कुलकर्णी, डॉ. संदीप नाटेकर, डॉ. नीलेश कोदे, डॉ. विनय शिरोडकर, डॉ. हेमा तायशेटे, डॉ. तावडे, डॉ. प्रशांत मोघे, डॉ. गुजर, डॉ. गीता मोघे, डॉ. अभिजीत आपटे, डॉ. वैशाली कोरगावकर, डॉ. सी. एम. प्रभू, धनंजय कसवणकर, नितीन बांदेकर, सारस्वत बँकेचे व्यवस्थापक दिलीप बंजारी, दिवाकर राणे, दिलीप रेडकर, सचिन कामत आणि अन्य उपस्थित होते. रोटरी क्लब, जाएंटस् ग्रुप, सिंधुरत्न फाऊंडेशन आदी संस्थांचे सहकार्यही लाभले होते.

डॉ. सरीन म्हणाले, भारतात दरवर्षी सुमारे दहा लाख कॅन्सरच्या रुग्णांचे निदान होते. विकसित देशांपेक्षा विकसनशील देशांमध्ये हे प्रमाण अधिक आहे. कॅन्सर हा कुणालाही व कुठेही होऊ शकतो. मात्र, पहिल्या अथवा दुसऱ्या स्टेजमध्ये उपचार केल्यास ८० ते ९० टक्के रुग्ण बरे होतात. मात्र, चौथ्या स्टेजला रुग्ण गेल्यास वाचण्याची शक्यता ही पाच टक्केच असते. त्यामुळे कॅन्सरबाबत सुरुवातीला उपचार करणे आवश्यक आहे.

डॉ. सरीन म्हणाले, स्तनाच्या कर्करोगाबाबत महिलांमध्ये जागृती आवश्यक आहे. महिला दरमहा स्वतः चाचपणी करून गाठीची खात्री करून शकतात. मात्र, आपल्याकडे वेळेत न सांगणे अथवा न पाहण्यामुळे धोके उद्भवतात. गर्भाशय मुखाच्या कर्करोगाबाबतही सुरुवातीलाच, रक्तस्राव होत असतो. अशावेळी तपासण्या करून उपचार केले तर रुग्ण बरा होऊ शकतो.

बदलत्या जीवनशैलीमुळेही कॅन्सर आणि मुख्यत्वे स्तनाच्या कर्करोगाचे प्रमाण वाढत आहे. शहरांमध्ये हे प्रमाण अधिक आहे. वातावरणातील बदलांमुळेही कॅन्सरचे प्रमाण वाढते, असे दिसत असले तरीही तशी शक्यता आहे. त्याबाबतचा पुरावा नाही. तंबाखू खाण्यामुळे कॅन्सर होऊ शकतो. परंतु तंबाखू न खाणाऱ्यांनाही तोंडाचा कॅन्सर होण्याचे प्रमाण पाच टक्के असल्याचेही डॉ. सरीन म्हणाले. कोकणपट्ट्यात स्तनाच्या कॅन्सरचे प्रमाण अधिक असून याचे कारण बदलती लाईफ स्टाईल आहे. उर्वरित महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात अशी 'लाईफ स्टाईल' नसल्याने तेथे एवढे प्रमाण नाही. कोकणच्या प्रमाणात काहीअंशी अनुवंशिकताही दिसून आली आहे. यावेळी डॉ. भाऊसाहेब बागल, शशांक ओझा यांनीही मार्गदर्शन केले. तसेच शंका-समाधानही करण्यात आले. सूत्रसंचालन डॉ. कुलकर्णी व डॉ. शिरोडकर यांनी केले, तर प्रास्ताविक डॉ. आंबेरकर यांनी केले.




**कणकवली :** कॅन्सरबाबत कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. राजीव सरीन. बाजूला डॉ. भाऊसाहेब बागल, डॉ. शशांक ओझा, डॉ. ज्योती कोदे, डॉ. प्रफुल्ल आंबेरकर, डॉ. शमिता बिरमोळे.

गुलमोहर फोटो, कणकवली

# बदलत्या जीवनशैलीमुळे कर्करोगाच्या प्रमाणात वाढ

## डॉ. राजीव सरीन : कणकवलीत कर्करोग निदान जागृती अभियान

**सकाळ वृत्तसेवा**

> कर्करोग जेव्हा शेवटच्या टप्प्यात पोचतो तेव्हा बरेचसे रुग्ण टाटा रुग्णालयात दाखल होतात. याचा अभ्यास केला असता कोकण पट्ट्यातील रुग्णांचा अधिक समावेश दिसून आला आहे. त्या दृष्टिकोनातून आम्ही वेगळा अभ्यास करत आहोत.
>
> **डॉ. राजीव सरीन, संचालक, टाटा मेमोरियल सेंटरचे संशोधन केंद्र.**

कणकवली, ता. १३ : अनुवंशिकतेतून कर्करोग होण्याचे प्रमाण केवळ पाच टक्के आहे; मात्र वातावरणातील परिणाम आणि बदलत्या जीवनशैलीमुळे कर्करोगाचे धोके अधिक वाढले आहेत. कोकण पट्ट्यात कर्करोगबाधित रुग्णांत मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे, असे मत टाटा मेमोरियल सेंटरच्या संशोधन केंद्राचे संचालक डॉ. राजीव सरीन यांनी येथे व्यक्त केले.

डॉक्टर फ्रायडे क्लब यांच्यावतीने येथील आचरेकर प्रतिष्ठानमध्ये कर्करोग नियंत्रण, निदान आणि आधुनिक उपचार पद्धती याविषयी कार्यशाळा घेण्यात आली. यात डॉ. श्री. सरीन यांनी मार्गदर्शन केले. श्री. सरीन म्हणाले, "कर्करोग वेगवेगळ्या टप्प्यांत फैलावतो. प्राथमिक अवस्थेत या रोगाची लक्षणे समजल्यास वेळीच निदान होऊ शकते. पहिल्या टप्प्यात योग्य असा उपचार झाला तर हा आजार पूर्णतः बरा होतो. आज प्रत्येक व्यक्तीच्या जीवन जगण्याच्या पद्धतीत कमालीचा बदल झाला आहे. त्यामुळे कर्करोगबाधित रुग्णांची संख्या वाढत आहे. यात तंबाखू, धूम्रपान, गुटखा ही व्यसने कारणीभूत आहेत. लहान मुलांनाही मेंदूचा किंवा रक्ताचा कर्करोग होऊ शकतो. कर्करोगाची खात्री झाल्याशिवाय उपचार होत नाहीत. प्रत्येक गाठ ही कॅन्सरची असतेच असे नाही. प्राथमिक तपासणी फार महत्त्वाची आहे. हा आजार कुणालाही कोणत्याही भागाला होऊ शकतो." महिलांमध्ये स्तन आणि गर्भाशयाचा कॅन्सर होण्याचे प्रमाण अधिक आहे. हा आजार अनुवंशिकतेतून होतो. आई किंवा वडील यांच्यामार्फत होऊ शकतो. वयाबरोबर याचे प्रमाणही वाढत जाते. अलीकडच्या काळात वातावरणातील बदल, वाढते तापमान, आधुनिक पद्धतीची यंत्रणा या गोष्टीसुद्धा कर्करोगाला निमंत्रण देत आहेत. म्हणूनच या रोगाचे प्राथमिक निदान महत्त्वाचे आहे, असेही श्री. सरीन म्हणाले.

या वेळी फ्रायडे क्लबचे डॉ. प्रफुल्ल आंबेरकर, डॉ. शमिता बिरमोळे, डॉ. विद्याधर तायशेटे, डॉ. विनय शिरोडकर, डॉ. संदीप नाटेकर तसेच सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कर्करोगाची प्राथमिक लक्षणे

- » शरीरातून रक्त जाणे.
- » वजन कमी होणे.
- » आवाजात बदल होणे.
- » आहाराचे प्रमाण कमी होणे.